# गोठण : रावजी राठोड
## ( बंजारा समाज व बोलीवर प्रकाश टाकणारी प्रथम कादंबरी )

प्रा. विष्णू राठोड
के.ए.ए.एन.एम.एस.कला वाणिज्य आणि
विज्ञान महाविद्यालय सटाणा
ता. बागलाण जि. नाशिक
भ्र. ९१७५६९०४८९
इमेल : rathodvishnubhaurao@gmail.com

*स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी कादंबरी विश्वात ग्रामीण कादंबरी, दलित कादंबरी, आदिवासी कादंबरी, स्त्रीवादी कादंबरी लिहली गेली. याचे कारण स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्री हे सर्व घटक शिक्षित झाल्यामुळे आपल्या संवेदना व्यक्त करण्याचं मोठ व्यासपीठ म्हणून त्यांनी कादंबरी हा प्रकार हाताळलेला आहे. काहींना त्यात यश आले. काहींना कादंबरी या वाड्मय प्रकाराचे तंत्रच समजले नाही. बंजारा साहित्यिकांनीही कांदबरी हा वाड्मय प्रकार हाताळलेला आहे. त्यात रावजी राठोड यांची 'गोठण' हरिश्चंद्र राठोड यांची 'संघर्ष' राजाराम जाधव यांची 'चंद्रकला' अशी काही नावे सांगता येतील.*

'कादंबरी' हा जीवनप्रवाहाबरोबर प्रवास करणारा प्रवाही असा मुख्य वाड़मय प्रकार आहे. मराठीमध्ये 'कांदबरी' हा वाङ्मयप्रकार पाश्चात्यांशी संपर्क आल्यानंतर पाश्चात्य साहित्याच्या प्रभावाने आला. निवेदन प्रधान असलेल्या या गदय वाङ्मयप्रकाराला इंग्रजीत 'Novel' असे म्हणतात. मराठीमध्ये या वाङ्मयप्रकाराला 'कादंबरी' हे नाव बाणभटाने संस्कृतमध्ये लिहलेल्या 'कांदबरी' या सुप्रसिध्द कथेवरुन दिले गेले. बाणभटाची कादंबरी आणि मराठी कादंबरी यांच्यात बरीच तफावत आहे. कादंबरी हा लिहणा—याला आपले मत मांडण्यासाठी खुली स्वायत्तता देणारा असा वाङ्मयप्रकार आहे. कांदबरी म्हणजे— ''काल्पनिक गदय, रंजक भाषा आणि रसाचे उत्कर्षबिंदू विस्तृत पटावर उभ्या केलेल्या व्युहात तो एक प्रकारचा जीवनहीज मगचमतपउमदज असतो. अर्थात लेखकाचे समग्र आकलन आनुषंगिक चिंतनासह मांडण्यासाठी खुले असलेले क्षेत्र म्हणजे कांदबरी.'' कादंबरीला व्याख्येच्या चौकटीत पकडण्याचा अनेक विद्वानांनी प्रयत्न केला. त्यामध्ये फिल्डिंगच्या मते—'' गंभीर वातावरण नसलेले महाकाव्य म्हणजे कादंबरी होय.'' तसेच ई.एम. फॉस्टरच्या मते ''Any Fictitious prose work over fifty thousand words will be a Novel '' अर्थात''पन्नास हजार शब्दाच्यावर लिहलेली गदयकथा म्हणजे कादंबरी'' चेवले यांच्या मतानुसार— ''गदय कल्पित कथा जिला अधिक विस्तार आहे ती म्हणजे कादंबरी'' मा. का. देशपांडे यांच्यामतानुसार ''जीवनाचे विस्तृत व कलात्मक गदयचित्र म्हणजे कादंबरी'' प्र.वा.बापट आणि ना.वा.गोडबोले यांच्यामते— ''सत्यसृष्टिच्या आधारे काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करुन,काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्वलंबित जीवित घटना यांचे गोष्ट रुपाने वर्णन करुन व कलानंदाची प्राप्ती करुन जीवनातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गदय वाङ्मय विभागम्हणज कादंबरी'' श्री.म.कुलकर्णी यांच्यामते— ''कार्यकारण शृंखलाबध्द अशा कल्पित कथानकाच्या द्वारे मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललितगदय कथा म्हणजे कांदबरी.'' कॅथरीन लिव्हर यांच्यामते—''कांदबरी म्हणजे कथात्मक लिखित गदयाचा, ब—यापैकी दीर्घ म्हणता येईल असा लेखकाने निर्मिलेला नव्या व कल्पित वास्तवात वाचकाला गुंतवून टाकणारा रचनाबंध होय.'' भालचंद्र नेमाडे यांच्या मते—''कांदबरी

म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली ,आशयसुत्राचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग,अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली आहेत अशी साहित्यकृती होय.''

जीवनातील अंतिम सत्य ही चिरकालीन व सर्वव्यापी असतात. जेव्हा अशा सत्याचे दर्शन अनुभूतीला पडलेल्या पैलूद्वारे, उत्कटतेने आणि पात्र, प्रसंगाच्या साहालयाने जीवनातील संमिश्र भावनाटय उत्कटत्वाने अविष्कृत होईल. आणि त्याचवेळी जीवनातील अंतिम तत्वाची जाणीव होत राहिल्याने त्या अनुभवाला नवनवे पैलू पडत राहतील त्यावेळी तिला व्यापकत्व व कलात्मकता येऊन ती कादंबरी श्रेष्ठ दर्जाची कलाकृती ठरेल. घटना, कथानक, पात्रे, निवेदक, निवेदनशैली, कादंबरीची सुरवात, मध्य व शेवट, वातावरण, भाषा आदी घटकांनी कादंबरीची संरचना ही उभी राहते. विविध प्रकारचे विषय घेऊन जीवनाशी संबधित अशी आशयसूत्रे पकडून कादंबरीने सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक, प्रादेशिक, काव्यात्म, आत्मचरित्रात्मक, संज्ञाप्रवाही, विज्ञानवादी, ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, मार्क्सवादी, गांधीवादी, अभिजातवादी, कलावादी, वास्तववादी, अतिवास्तववादी असे अनेक अवतार धारण केलेले आहेत.

मराठीतील पहिली कादंबरी म्हणून इ.स. १८५७ साली लिहली गेलेली बाबा पद्मनजी यांची 'यमूना पर्यटन' या कादंबरीकडे पाहिले जाते. यास पहिली सामाजिक कादंबरीही म्हणतात. पहिली ऐतिहासिक कांदबरी 'मोचनगड' ही रा. भि. गुंजिकरांनी इ.स.१८७१ साली लिहली. इ.स. १८१८ ते १८७४ या कालखंडात कांदबरी ही भाषांतरित अनुवादात्मक, अद्‌भूतरम्य, पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक अशा अनेक प्रकारात लिहली गेली मात्र कांदबरी या वाङ्मय प्रकाराला ख—या अर्थाने प्रतिष्ठा ही हरिभाऊ आपटे यांनी करुन दिली. इ.स. १८८५ ते १९२० या काळात हरिभाऊ आपटे यांच्या बरोबर साहित्यसम्राट न.चि.केळकर, तात्विक कांदबरीचे जनक वा.म.जोशी. ज्ञानकोषकार केतकर, शि.म.परांजपे, कोल्हटकर आदिंनीही कांदबरी लेखन केलेले दिसते. कांदबरीला वैभवाच्या शिखरावर नेण्याचे काम दोन लेखकांनी केले. त्यात कलावादी विचारसरणीचे ना.सी.फडके व 'समाजासाठी कला' या विचारसरणीचे पुरस्कर्ते वि.स.खांडेकर. यांच्याबरोबरीने पु.य.देशपांडे, श्री.व्य.केतकर, वसंत कानेटकर, बा.सी.मर्ढेकर, विश्राम बेडेकर यांनीही लेखन करुन मराठी कांदबरी समृध्द करण्यात मोलाची भर घातली. लेखिकांनीही कादंबरी हा प्रकार हाताळलेला दिसतो. त्यात विभावरी शिरुरकर, प्रेमाबाई कंटक, शांता शेळके आदी. इ.स. १९५० ते १९७५ या कालावधीत कादंबरीत विविध अंगानी लेखन झाले. त्यात प्रादेशिक, ग्रामीण, दलित, ऐतिहासिक, वैज्ञानिक, मनोविश्लेषणवादी, 'स्त्री'वादी, आदिवासी यामुळे कादंबरी हा वाङ्मय प्रकार मराठीमध्ये हळूहळू समृध्द होत आहे. सध्या अत्यंत संवेदनशील, तीव्र बुध्दिमत्तेच्या, विविध स्तरातील आणि जागतिक पातळीवरील वाङ्मयीन क्षेत्रातील विविध प्रवृत्ती प्रवाहांची जाण असणा—या कादंबरीकार यांची संख्या हळूहळू वाढत आहे. त्यामुळे मराठी कादंबरी ही मोठी आव्हाने पेलण्यास समर्थ असा वाङ्मय प्रकार आहे. हे ठामपणे सांगता येईल.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी कादंबरी विश्वात ग्रामीण कादंबरी, दलित कादंबरी, आदिवासी कादंबरी, स्त्रीवादी कादंबरी लिहली गेली. याचे कारण स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्री हे सर्व घटक शिक्षित झाल्यामुळे आपल्या संवेदना व्यक्त करण्याचं मोठ व्यासपीठ म्हणून त्यांनी कादंबरी हा प्रकार हाताळलेला आहे. काहींना त्यात यश आले. काहींना कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे तंत्रच समजले नाही. बंजारा साहित्यिकांनीही कांदबरी हा वाङ्मय प्रकार हाताळलेला आहे. त्यात रवजी राठोड यांची 'गोठण' हरिश्चंद्र राठोड यांची 'संघर्ष' राजाराम जाधव यांची 'चंद्रकला' अशी काही नावे सांगता येतील.

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

'गोठण' ही रावजी राठोड लिखित कांदबरी इ.स.२००७ मध्ये शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर ;महाराष्ट्रद्ध यांनी प्रकाशित केली. बंजारा बोलीतून मराठीचा आधार घेत 'गोठण' या कादंबरीला साकारणारे रावजी राठोड हे बंजारा साहित्यातील वाड्मयीन गुणवत्तेच्या कसोटीवर लेखन करणा—या साहित्यिकांमध्ये अग्रगण्याने नाव घ्यावे लागते. बंजारा साहित्यिकांमध्ये आत्माराम कनिराम राठोड, जवाहर राठोड, मोहन नाईक, मांगीलाल राठोड, उत्तम राठोड, राजाराम जाधव, प्रेमदास राठोड, रामकुमार चव्हाण, राजाराम राठोड, किशन पवार, प्रमिला राठोड, शशिकला चव्हाण, हरिश्चंद्र राठोड, नथ्थू चव्हाण, डॉ. रमेश जाधव, रतन आडे, अरुंधती नाईक पंजाब चव्हाण, डॉ रुक्मिणी पवार, प्रमिला जाधव, ललिता राठोड अशी अनेक नावे घेता येतात. मात्र कादंबरी हा प्रकार प्रथमतः हाताळला तो रावजी राठोड यांनी. रावजी राठोड यांनी वाड्मयाच्या सर्वच प्रकारामध्ये लेखन करुन बंजारा साहित्यिकांसमोर एक आदर्श स्थापन केला आहे. रावजी राठोडाने 'तांडेल' हे आत्मकथन इ.स. १९९९ मध्ये प्रकाशित केले. या आत्मकथनास महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'लक्ष्मीबाई टिळक' पुरस्कार मिळाला आहे. 'मलाण' नावाचा काव्यसंग्रह इ.स.२००४ मध्ये प्रकाशित केला. 'विमुक्तवेध' नावाचा वैचारिक ललितलेखसंग्रह प्रकाशित झालेला आहे. 'बंजारा लोककला' लोककथासंग्रह 'गोठण' ही बंजारा समाजावर प्रकाश टाकणारी एकमेव कांदबरी म्हणता येईल. 'कादंबरी' सारखा निवेदन प्रधान वाड्मय प्रकार हाताळून बंजारा समाजाचे वास्तविक दर्शन घडविण्याचे महनीय कार्य रावजी राठोड यांनी केले आहे. 'बंजारा पुकार' नियतकालिकाचे उपसंपादक म्हणून काम केलेलं आहे. तसेच 'नांदेड पिपल्स व्हिजन' या महाविदयालयातून उपप्राचार्य पदावर असतांना निवृत्त झालेले आहे. अशा या महान साहित्यिकाचा मृत्यू अलिकडे १० जानेवारी २०१५ मध्ये झाला. महाराष्ट्र शासनाने रावजी राठोडांना उत्कृष्ट वाड्मय पुरस्काराने सन्मानितही केले आहे. अशा या महान साहित्यिकाच्या एका साहित्यकृतीवर प्रकाश टाकून माझी खरी श्रध्दाजंली वाहतो.

'गोठण' ही पस्तीस प्रकरणात विभागलेली आणि दोनशे सात पृष्ठात समावलेली कादंबरी आहे. मराठी वाड्मय विश्वात पहिल्यांदा तांडयाचे वास्तव चित्र साकारणारी पहिली कांदबरी आहे. तांडयातील दु:ख, वेदना आणि तांडयातील जीवन, संस्कृती रेखाटणारी ही कांदबरी मराठी साहित्य विश्वात अनमोल लेणेचं ठरली आहे. प्राध्यापकी करणारा चंदन राठोड हा समाजोत्थान व्हावे यासाठी संघर्ष करतांना दिसतो. अशिक्षितपणा, अंधश्रध्दा व दैववादी दृष्टिकोन यामुळे तांडा अंधाराच्या खायीत आहे. 'नायक बोले तांडा चाले, भगत बोले तांडा डोले' या समीकरणाची प्रचिती आपल्याला येते. या कांदबरीत ढोंगी महाराज व पोटार्थी भगत तांडयातील सर्वसामान्य माणसांना देवाधर्माच्या नावाखाली लुबाडतात. तांडयातील नसाब पध्दत म्हणजे जातपंचायत ही वाचकांचे लक्ष वेधून घेते. फारकत दयायची झाली तर मळाव, चोरी झाली तर नसाब असे अनेक प्रसंग 'गोठण' या कांदबरीत पाहवयास मिळतात. पळसगावचा गावश्या चोरी करतांना पकडला जातो. व नसाबात तीनशे रुपये जूर्माना भरुन मोकळा होतो. मंगला अनौरस संततीला जन्म देते म्हणून मुलाचा बाप ठरविण्यासाठी नसाब बसविला जातो. फरेंगी सारखी स्त्री नव—याला आव्हान देऊन परपुरुषाशी आपला संबंध नाही हे सिध्द करण्यासाठी नसाबाला सामोरे जाते. तीची 'दुधकचेरी' केली जाते. यावरुन तांडयात जात पंचायतीला किती महत्व आहे. हे सिध्द होते. बंजारा समाजही इतर समाजासारखा जाती पोटजातींनी पोखरलेला असून ढालीया, धाडी, भंगी, सनार, इ. पोटजाती आहेत. यावरुन गोरगणातील जाती पोटजाती लक्षात येतात. पिंपळ तांडयातील सोय—याची कष्टाने जमा केलेली संपती पोलिस लुटून नेतात. गुन्हा हाच की त्याने दरोडेखोराला जेवण दिले. यावरुन खादी रक्षक भक्षक बनतात. यामुळे त्याचा संसार उध्वस्त होतो. अशा भकास तांडयामध्ये चंदन आणि सोनलची प्रेमकथा ही काजवे चमकावे तशी चमकतांना दिसते. तांडयामध्ये अक्षरशत्रू

आणि ज्ञानशुन्य माणसांचे वेदनामय जगणे, दगडाला भाग्यविधाता मानून नवस करण्याची वृत्ती, लिंबू, गंडेदोरे, तंत्रमंत्र यांच्या साहालयाने आणि दारु बोटी यामुळे अनमोल आयुष्य बरबाद करणारे लमाण तांडा या कांदबरीतून दिसतात.

तंत्रज्ञान आणि विज्ञान युगात बंजारा समाज हा पारंपरिक रुढी, परंपरा आणि संस्कृतीच्या नावाखाली, देवाधर्माच्या ओझ्याखाली दबलेला पाहावयास मिळतो. सत्ता आणि पैसा यांच्या जोरावर पुढारी आणि खाकी वर्दी वाले तांडयातल्या निरक्षर लोकांचा छळ करतात. ग्रामपचायतीत काही पद मागायला गेले असता वा काही करायचे असल्यास — ''निघालास थोबाड वर करुन श्याना पद मागाया, पद भुषवायची अक्कल आली व्हयं तुमच्यात? पोटाला भुसा मागा, कनिक कण्या भरडून खा अन् पोट भरा. निघले संरपंच व्हया! कवा केलतेरे संरपंचकी? चोरी, डाके अन् दरोडे घालण्यात जिंदगी गेली अन् निगाले आता सरपंच व्हाया.'' सरकारी योजनांचा लाभ मिळावा म्हणून अर्ज केला तर ''काय शेरडं न् मेंढरं घिऊन धनगर व्हायचं का? मेंढर चोरता जलम गेला, आता निघाले धनगर व्हायला! किंवा ''कंदी केल्तावरं लंबाडयाचा बेपार? हं? चोरी करा न्हाय तर दरोडे घाला. बेपार करत्यात म्हणं. जावा खुडून खावा कणसं, दिस—याच्या वावरातले, न्हायतं भटटी लावा, निगाले दुकान लावाया. धंदा करा बापजादयाचा!'' असे हेटाळणीचे शब्द तांडयातला नेहमीच झेलावे लागतात. या कादंबरीत तांडयातील दयनिय जगणे तर कळतेच शिवाय कांदबरीला एका वेगळया उंचीवर नेवून सोडते.

देशाला स्वातंत्र्य मिळून साठ पेक्षा जास्त वर्षे झाली तरी वर्तमान स्थिती पाहता तांडे पाडे वाडया आपल्या मुलभूत हक्कापासून वंचित आहे. 'बा' च्या तोंडून याविषयी समाचार घेतांना रावजी राठोड म्हणतात — '' देस स्वतांत्री झाला बाबा, पर आपून कुठ आहोत ? देसात लोकसाही आली म्हनत्यात, पर आपल्या गावात कुठ दिसतीया का ? कुठं हाय आपून लोकांचा गावठाणा? गायरानात झोपडे बांधून गावची घरपट्टी भरतांव का न्हाय ? आपनाला कुठला आला रोडरस्ता? त्येंच्या संडासमंदी ढुंगणावर इजचा उजेड पडतो . पर हामच्या वाटवरचा काळाकुट्ट अंधार अजूक जाता जाईना. त्ये बर्फाचं पाणी पित्यात. हामास्नी अजूक हि—यातलं गढूळ रेंदाड प्याया पुरनं.आपुनं आजुकबी कोसभर खोरीतून डबक्याचं पानी टेमकाडाला व्हात हावोत.''[१२] लेखकाची ही उपरोधपूर्ण शैली विद्रोहाच्या अंगाने फुलते. या कांदबरीचा नायक संघर्षासाठी तयार होतो. चंदन नावाचा तरुण चंदनाप्रमाणे झिजतो. आपल्या नावाला सार्थक असे कार्य करतांना दिसतो. डॉ. बाबासाहेबांच्या वचनानुसार शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा. या तत्वाने प्रेरित होवून आमदारकीची निवडणूक लढण्यास सिध्द होतो. राजकीय डावपेचात कमी पडल्यामुळे पक्षाचे तिकीट त्याला मिळत नाही. परिणामी माघार घ्यावी लागते. वामसेफ नावाच्या संघटनेच्या माध्यमातून गोरबांधवात नवचैतन्य पसरवतो. अत्याचाराला सरकारी दरबारी नेतो. साहित्य हे समाज प्रबोधनाचे हत्यार व संस्कृतीच्या ऐश्वर्याचे गमक आहे हे ओळखून लमाण तांडयात साहित्य संमेलन आयोजित करतो. '' ज्या समाजाचे साहित्य अधिक , त्या प्रमाणात त्या समाजाची संस्कृती प्रगत व प्रगल्भ असते. साहित्य नसलेल्या समाजाची अवस्था वानराच्या कळपागत.'' असे अंत:करणापासून बोलून साहित्याचे मानवी जीवनातील अनन्यसाधारण पटवून देतो. मुख्यमंत्री जसे येतात तसेच खंडीभर आश्वासन देवून पसार होतात. मात्र त्यामुळे तांडयातला नायकाला मात्र मोठा पुढारी म्हणून रोष पत्करावा लागतो. या कादंबरीच्या कथानकामध्ये चंदन हा नि:स्वार्थपणे संघर्ष करणारा भोळयाभाबडया गोरगणांना गावगुंड, ढोंगी पुढारी, नायक, भगत यांच्या तावडीतून सोडविण्यासाठी प्रस्थापितांविरुध्द

दंड थोपटतो. तांडा फुलविण्यासाठी अहोरात्र झटणारा या नायकाला कोणतेही श्रेय मिळत नाही. रंगनाथ पठारे यांच्या मते – '' गोरबंजारा जमातीत जन्मलेल्या एका लढाऊ तरुणाची ही श्रेयहीन गाथा आहे. ''

'गोठण' मधील स्वभावरेखाटन: कादंबरी हा वाङ्मय प्रकार निवेदन प्रधान आहे. 'गोठण' या कादंबरीत **चंदन राठोड** हा संवेदनशील तरुण निवेदकाचे काम करतांना दिसत असला तरी या कादंबरीतील सर्वच पात्रे ही जिंवत वाटतात. **चंदन राठोड** हा कांदबरीतला मुख्य पात्र असून तो नि:स्वार्थी, समाजासाठी झटणारा, प्राध्यापकी जपून तांडयाला प्रकाशवाट दाखविणारा, लग्नाच्या बेडीत न अडकणारा, तांडयात साहित्य संमेलनाचे आयोजन करणारा, गोर बांधवांना ढोंगी बुवा, भगत आणि पुजारी यांच्या तावडीतून सोडविणारा,खोटया आरोपाखाली डांबलेल्या समाजबांधवाना सोडविण्यासाठी झटणारा,समाजाच्या हितासाठी रोष पत्करणारा गोर समाजातला नवयुवक आहे. या पात्राबरोबर **बा** हे पात्रही लक्षात राहते. 'चोरी आणि लबाडी करु न्हाई' असे धडे देणारा आहे. उपजिविकेसाठी रानोमाळ भटकून तेंदूची पाने तोडणारी नि मोळी विकणारी, सणावारालाही जीर्ण वस्त्र परिधान करणारी **याडीचे** अठराविश्व दारिद्रय बघून डोळे पाझरायला लागतात. भुरटया चो—या करणारा **गावश्या**, अनमोल जीवन अध्यार्वर त्यागणारा **टीका**, रुढी मोडली म्हणून बायकोला ढोराप्रमाणे तुडवणारा **झंप्या**, बायकोसाठी पुरात उडी ठोकणारा **मंजा**, तांडयाला लुटणारा व पिठल्या भाकरीवर राबराब राबून पन्नासीतच सत्तरीचा वाटणारा **भुजंग्या**, जंगलात प्रसूत होणारी आणि नखाने नाळ तोडणारी **पिरी**, नव—याचे निमुटपणे मार सोसणारी **चंपी**, देव बकरा खायेनी तारो डोकरा, ये छ रे तारं जिभली र नकरा.'' असे उपदेश करणारा गुरुभाऊ, वाग्याशी अनैतिक संबंध प्रस्थापित करणारी फरेंगी, ही फरेंगी नव—याला हिसका दाखविते. '' म्या तसं कायबी केल्यालय न्हायं, वाटवर थान लागली त पानी पिनं गुना व्हत न्हाई ! अन् उपाशी पोटी दिसं कसं ढकलायचं ? मर्दाची जात म्हणू भूक लागली तं तुमी कुठंभी हादडायचं आन् हामी बाईजात सतीसायत्री व्हवून तुमची वाट बघत बसायचं. झाडाचं फळ खाल्लं तर चोरी व्हतीय? हामचं जगणं तर रानपखेरुगत हाय. भरल्या कणसावर पखेरु बसल्याबिगर —हात्यात? गोफण घुमवल्यानबी उडता उडना इतं तर राखणंच नको, म्हणल्यानं कसं व्हायचं? अंगाला हात लावायच काम न्हाय. हिमंत असेल तर बसवा मळाव. व्हउंदे नसाब निवाडा काय व्हायचं ते व्हईल फसयला''अशी बंडखोर फिरंगी आपल्याला गोठणमध्ये पहावयास मिळते. बावन्न गाडी विदयेचा मालक, मंत्राने माणसाला मारायची भाषा करणारा आणि तेराशे बक—यांचा बळी घेणारा अघोरी भगत, संपती व सत्तेच्या जोरावर तमाशेवालीला पळवणारा, मर्दानी संगीशी रत होणारा तुंबगावचा जमीनदार, नवरा सोडून भर यौवनात मर्दानकी करत फिरणारी, माणसाची सावली न पडू देताही पोटूशी राहणारी व अनौरस संततीला हाताने यमसदनाला धाडणारी क्रुर संगी, बायकोची झुंज मुकाटपणे पाहणारा मातरागमणी, बायकोचे टोमणे झेलणारा सांबर काका, लेकीच्या घराकडे तुच्छतेने पाहून चुळ भरणारा तानसंग नाना, 'इतून तिपन लावनं त हैदराबाद पतूर पेरत नेईन पयका' असे म्हणणारा धोंडुजी पाटील, अखंड नशेत राहणारा सामगोतचा वाल्या, बापाच्या कडवट बोलाने निराश होणारी आणि एक दिवस चंदन आपल्याला स्वीकारणार अशा भावनेने नखशिखांत मोहरुन जाणारी सोनल, अशा अनेक व्यक्तीरेखा गोठणमध्ये आपल्या मनाची पकड घेणा—या आहेत. याशिवाय अनेक दुलयम व्यक्तीरेखा असलेली पात्रे या कांदबरीत पहावयास मिळतात. त्यात उपदेशात्मक भजन गात फिरणारा बाळा महाराज, दारु गाळणारा किसन्या, यौवनाने मुसमुसलेली रंगी, काबाडकष्ट करणारा धारबा व गेंदिया, तांडयाला लुबाडणारा आला, गेला तसेच धुप्या, भिवा, नागू, देवचरण महाराज, आबा गोठणकर, सगुणाबाई,श्यामलाल नायक, आवताडे सर अशा अनेक पात्रांचा उपयोग लेखकाने कांदबरीमध्ये केलेले आहे. कांदबरी हा विस्ताराने अनुभव

मांडता येणार व्यासपीठ असल्याकारणाने लेखकाने अनेक पात्रांची निर्मिती करुन कथानकाला उठावदारपणा आणण्यात व वाचकांना एकात्म अनुभव देण्यात लेखक रावजी राठोड यशस्वी झालेले आहे.

'गोठण' या कांदबरीतील निवेदनाची भाषा ही वैशिष्टयपूर्ण आहे. रंगनाथ पठारे यांच्यामते – '' गोर बंजारा भाषेचं सांस्कृतिक सौष्ठव जे या लेखनात ठायी ठायी सहज प्रकट झालेलं आहे.'' याची जाणीव गोठणमध्ये पदोपदी येते. गोठणच्या निमित्ताने गोरबोली आणि मराठी यांच्या संयुक्त मिश्रणातून अनोखी भाषा अवतरली आहे. या कादंबरीत कल्पकतेचा अतिशय सुंदर वापर केला आहे. निवेदन शैली ही पात्रपरत्वे बदलतांना दिसते. उदा. दलित भुजंग्याची भाषा ही '' हायाज जी साब .... कवा आलाव जी?'' तर नंदिबैलवाल्याची भाषा ही ''कयाचं शिकणं आलय मा .... सायब. दिसातनं सतरा गावं तुडिल्यानं कुठ पसाभर भुसा भेटतुया पोटाला मंग हामी पोरास्नी कुठल्या शाळेत धाडावं.'' फासेपारध्याची भाषा ही '' मारी रांडगोणी, तोन कंकाळीन काटू '' तर लमाणाची भाषा ही '' आरेरे सोगन भा भुलगोरे ! '' अशी दिसते. लेखकाने या कादंबरीत प्रतिमा प्रतिकांचा मोठया खुबीने वापर केला आहे. उदा. 'भसा भसा पिसं उपटून टाकल्या कोंबडीगत तांडा दिसायलेला', 'खबरदार घुबडागत बसलेला शिवतांडा बघून काळीज हालून गेला', 'चकमक झडून फुंलंगा पडावा तसं टकु–यात चमकलं', तसेच आलंकारीक भाषेचा वापरही लेखकाने केलेला आहे. उदा. हिरवीगार लसलसीत शेती, हिरवी लस्स भुईमुंग, काळबंब टरबुजागत तोंड अशी भाषा कांदबरीत वापरलेली असल्यामुळे कांदबरीची खुबी वाढली आहे. या कांदबरीत बोली भाषेबरोबर म्हणी, वाक्प्रचार, केणावट, लोकगीते, भजन, लेंगी, आरदास याचांही अतिशय समर्पक असा वापर केलेला आहे. उदा. 'धडाला ना गोडाला, झंडा लावा गडाला', 'देव बसला देयाला, आन् पदर नाही घेयाला', ' गवसाला तर चोर नाही तर शिरजोर!' इ. तसेच गोर केणावटेचे उदा. 'अंबल कमाव जीव अन् साईर माथं दोषं', 'तंगण खांणू न कांजन हांगणू', 'बडेबडे हारगे न कुकड पार वतारगे' इ. तसेच गोबोलीचे उदा. बाटी, मळाव, वाया, डोकरा, आरदास, धणी, लेंगी, मोटयारंमालं, सगाई, तंगी असे अनेक शब्द या कांदबरीत आलेले आहेत. या कादंबरीच्या शेवटी लेखकाने गोर शब्दाचे अर्थ मराठीत दिलेले आहे. त्यामुळे ही कादंबरी समजण्यासाठी कोणतीही अडचण येत नाही.

| अ.नं. | बंजारा शब्द | मराठी | अ.नं. | बंजाराशब्द | मराठी |
|---|---|---|---|---|---|
| १ | अबोट | न पिलेल्या भरल्या घागरीतील पाणी | २ | ढुंगो | डाव्या बाजुने न शिवता ठेवलेली घाग–याजवळची मोकळी जागा |
| ३ | दादी | आजी | ४ | काग | कावळा |
| ५ | अग्यारी | चिता, सरण | ६ | काचोपाको | अर्धवट शिजवलेले अन्न |
| ७ | आरदास | प्रार्थना | ८ | केणावट | लोकम्हणी |
| ९ | अंबल | परिणाम,अंमलबजावणी | १० | छरी | सुरी |
| ११ | इना | विणा | १२ | जाण्या | देवाचा भक्त |
| १३ | जिवाल | रानातले पशू | १४ | थिकळी | ठिगळ |
| १५ | टोकणी | चरवी | १६ | दुध कचेरी | न्यायदानात दंड ठोठावणारे लवाद |
| १७ | टुकरी | ओढणी | १८ | धणी | नवरा |
| १९ | डोकरा | म्हातारा | २० | बाटी | भाकर |
| २१ | डोकरी | म्हातारी | २२ | बेडो | भांडयावर भांडे ठेवून वाहणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | ढाडी | सारंगी वाजवून भीक मागणारी गोर जमात | २४ | भबरी | लहान मटके |
| २५ | ढाल्या | डप वाजवून भीक मागणारी गोर जमात | २६ | मळाव | गोरपंचायत |
| २७ | मामलो | फारकत | २८ | मोटयारमाला | तरणेताठे |
| २९ | या/ याडी | आई | ३० | राम | ताकद/ श्शक्ती |
| ३१ | रैनित | कर्जात | ३२ | रीच | अस्वल |
| ३३ | लगी | देवीचं मंदिर | ३४ | लेण | लाईन |
| ३५ | वाया | विवाह | ३६ | वतळपतळ | उलटेपालटे |
| ३७ | हाट | बाजार | ३८ | हंगोळे | वावटळ |
| ३९ | समण | अपशकून | ४० | समसार | संसार |
| ४१ | साक्तर | श्शास्त्र | ४२ | साळया | कोल्हा |

**'गोठण'** या कादंबरीविषयी अभिप्राय व्यक्त करतांना प्रसिध्द साहित्यिक **रा.रं. बोराडे म्हणतात**— 'गोठण' या रावजी राठोड यांच्या कादंबरीत एका लढयाची हकिकत आहे. गोर बंजारा जमातीत जन्मलेल्या एका लढाऊ तरुणाची ही श्रेयहीन गाथा आहे.त्याचा लढा हा त्यांच्या लोकांच्या उत्थानासाठीचा आहे. कुटुबांच्या अन् तांडयाच्या पातळीवर सतत लढण,त्यात यश अपयश हे तर आहेच अधिक महत्वाचं वाटतं ते गोर **बंजारा भाषेचं सांस्कृतिक सौष्ठव,** जे या लेखनात ठायी ठायी सहज प्रकट झालेलं आहे. सतत अवमान झेलणा—या, माणूस म्हणूनही नीट मान्यता न मिळालेल्या तांडयातील माणसांनी आपलं आंतरिक जगणं ज्या अमोल अशा सांस्कृतिक समझदारीनं तेवत ठेवल आहे, ते सगळे हेवेदावे, भांडण, लट्ठालट्ठी यांना पुरुन उरतं. आपल्या अंत:करणात निश्चित जागा करतं. रावजी राठोड यांनी मराठीत लिहणं हे मराठीला समृध्द श्रीमंत करणारे आहे. दूरुन दिसणारी किंवा अजिबात न दिसणारी एका मराठी समाजाच्या जगण्यातली धग आपल्या लेखणीनं काहिशा अवघडपणे त्यांनी मराठी साहित्यात आणली आहे. गोर बंजारा भाषेनं मराठीला ही अनमोल अशी भेटच दिली आहे.'' **रंगनाथ पठारे यांच्यामते** — '' गोर बंजारा भाषेचं सांस्कृतिक सौष्ठव या लेखनात ठायी ठायी सहज प्रकट झालेलं आहे. इंग्रजांनी 'बंजारा' या व्यापारी समाजास गुन्हेगार ठरवून तारेच्या कुंपणास बंदिस्त करुन टाकले. भारताला इ.स.१९४७ मध्ये स्वातंत्र मिळाले. मात्र बंजारा समाजाला त्यानंतर जवळपास २० वर्षांनी कायदा करुन मुक्त केले गेले. म्हणूनच बंजारा समाजाला विमुक्त जनजाती असेही म्हटले जाते. या कादंबरीच्या माध्यमातून रावजी राठोड यांनी २१ व्या शताकातील तांडयातील संस्कृतीबरोबर बंजारा बोलीचे सौंदर्यही दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, जादुटोणा, व्यसनाधिनता, जातपंचायत अशा अनेक कारणामुळे बंजारा समाज हा इतर समाजापेक्षा खूप मागासलेला आहे. बंजारा समाजातील बहुतांशी माणसे उदरनिर्वाहासाठी महाराष्ट्रातीलच नाही तर देशातील अनेक साखर कारखान्यात ऊस तोड कामगार म्हणून कामाला जातात. या सर्व गोष्टी 'गोठण' या कादंबरीत पहावयास मिळतात. होळी, दिवाळी असो वा तीज सारखे आणखी काही सण, साजरे करण्याची एक वैशिष्टयपूर्ण पध्दत आहे. यातून बंजारा समाजाच्या संस्कृतीचे दर्शन तर घडतेच शिवाय बंजारा समाजातील सदय:स्थितीचे दर्शन घडवून इतर समाजांच्याही लक्षात आणून देण्याचा प्रयत्न रावजी राठोड यांनी केला आहे. ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे.

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

संदर्भ ग्रंथ :

१. **Foster E.M. – 'Aspects of the Novel ', London , Edward Arnold and Co., 1937.**
२. प्र.वा.बापट, ना.वा.गोडबोले– 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती,१९७३.
३. श्री. मा. कुलकर्णी उद्‌धृत, खाडीलकर शुभदा, 'मराठी कांदब–याची रंगयात्रा 'मानसन्मान प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती १९९१.
४. कॅथरीन लीव्हर– उद्‌धृत, जया दडकर ;संपा.द्ध ए 'वाङ्मयीन संज्ञा– संकल्पना कोश',भटकळ फांउडेशन प्रकाशन, मुंबई. प्रथम आवृत्ती २००१.
५. भालचंद्र नेमाडे – 'टीकास्वंयवर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद. प्रथम आवृत्ती १९९०.
६. विमुक्त रंग– डॉ. रमेश जाधव, गोरवाणी प्रकाशन, औरंगाबाद
७. पांडुरंग कचेश्वर पाटील – ' वनजारी – बनजारी ' सुराकिर्ती प्रकाशन,नाशिक १९९९.
८. डॉ.मोहन चव्हाण– 'बंजारा बोली भाषा : एक अध्ययन' सूर्या प्रकाशन, कानपूर,२००७.
९. बळीराम पटेल – 'गोर बंजारे लोकांचा इतिहास', देशमुख ॲड कंपनी, अमरावती, १९३९.
१०. प्रा.मोतीराज राठोड– 'गोरमाटी', बंजारा सांस्कृतिक साहित्य परिषद,औरंगाबाद, १९९८.
११.रावजी राठोड – 'गोठण', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००७.